MADC

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)
दूरध्वनीः ०२२–४९२१ २१२१ • फॅक्सः ०२२-२२१६ ३८१४
CIN : U45203MH2002SGC136979

म.वि.वि.कं./२०२६/प्रशा/ 473

दिनांक: १५ जून, २०२६

# बोर्ड नोटीस

**विषय** : मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.वि.वि.कंपनी मर्या., मुंबई यांच्याकरिता भाडे तत्वावर वाहन उपलब्ध करण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई हा महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम असून, या उपक्रमांतर्गत राज्यातील अन्य महत्व्याच्या ठिकाणी विमानतळ विकसीत करण्याची जबाबदारी आहे.

आता उपरोक्त विषयांकित बाबींस अनुसरून खाली नमूद केलेल्या वाहनासाठी एका वर्षाकरीता दिनांक ०१.०७.२०२६ ते ३०.०६.२०२७ या कालावधीसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**वाहनाचा प्रकार - Mahindra 7XO AX7 MT Petrol Nebula Blue**

**भाडे तत्वावरील वाहनासंदर्भात अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:**

१ . दरपत्रकामध्ये एक महिन्याच्या कालावधीसाठीचा दर देण्यात यावा.

२. दरपत्रक हे प्रति महिना ठोक रक्कमे सह सादर करणे.

३ . वाहन एक वर्षापेक्षा जुने नसावे.

४ . वाहन चालक हा म.वि.वि.कंपनीकडून पुरविण्यात येईल आणि त्यांचे मानधन व इतर भत्ते हे सुद्धा कंपनीकडून देण्यात येईल, ही बाब विचारत घ्यावी.

५ . पेट्रोल, डीजेल, वाहन पार्किंग शुल्क व टोल शुल्क इत्यादीबाबीचा येणारा खर्च हा म.वि.वि.कंपनीकडे राहील, ही बाब विचारत घ्यावी.

६ . वाहनाचा वापर हा २४ तासांकरिता आहे, हे गृहीत धरून दरपत्रक सादर करावे.

७ . वाहन विमा, वाहन सेवाकर, वाहन वंगन, वाहन सर्विस व इतर इत्यासाठी येणारा खर्च हा पुरवठादाराने करावयाचा आहे.

८ . वाहन तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आणि त्याचे अनुज्ञेय असलेले सर्व परवाने पूरवठादाराकडे असणे बंधनकारक राहील. तसेच सर्व कागदपत्रांची एक प्रत इकडील कार्यालयास सादर करावी.

९ . वाहनाशी संबंधित विविध परवाने आणि वाहतुकीशी संबंधित नियम यांचा भंग केल्यास, त्याबाबतचे दंडात्मक शुल्क भरण्याची जबाबदारी पूरवठादारवर राहील.

१० . पुरवठा करण्यात येणारे वाहन नेहमी स्वच्छ आणि सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

११ . प्रत्येक महिन्याचे देयक हे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई यांचे नावे देण्यात यावे.

१२ . अदा करावयाच्या दरमहाच्या देयाकामधून आयकर कपात करण्यात येईल.

वरील सर्व बाबी विचारात घेऊन आपले सिलबंद दरपत्रक **दिनांक १५-०६-२०२६ ते दिनांक २४-०६-२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत** म.वि.वि.कंपनी मर्या., मुंबई, ८ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र नं-१, कफ परेड, मुंबई - ४००००५ येथे जमा करावे.

सर्वात कमी दर आणि वरील अटी शर्ती पूर्तता करण्यात येणाऱ्या पुरवठादार यांची नियुक्ती करण्यात येईल.

P.Bhin 15/6/26

**कंपनी सचिव/प्रभारी-प्रशासन**

मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
यांच्या मान्यतेने